पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १७१**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक – **२६/०५/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक **२६/०५/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६) मा.तरस बाळासाहेब जयवंत
७) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८) मा.प्रसाद शेट्टी
९) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
१०) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
११) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
१२) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
१३) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१४) मा.काळे विमल रमेश
१५) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१६) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे–सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.खोसे - सहा.आयुक्त, मा.डॉ.साळवे - अति.वैद्यकीय अधिकारी, मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.दुधेकर, मा.निकम, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कपिले, मा.थोरात,मा.साळवी, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी, मा.कांबळे,मा.औंभासे, मा.गट्टूवार, मा.शेख - कार्यकारी अभियंता, मा.इंदलकर - कामगार कल्याण अधिकारी, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -</u>**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-३६) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील फ मुख्यालय या कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत – मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-३७) | मा.स्थायी समिती ठ.क्र.११५२४ मध्ये मजकूर समाविष्ट करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-३८) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील “ड” प्रभाग व “ड” मुख्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-३९) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील “ड” प्रभाग व “ड” मुख्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४०) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ब क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत – संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४१) | फ क्षेत्रीय क्षेत्रिय कार्यालय मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत – मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४२) | मनपाच्या वायसीएमएच येथील १०१० KVA क्षमतेच्या जनित्रसंचाचे वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेचे कामाबाबत... |
| विषय क्रमांक-४३) | पिंपरी चिंचवड मनपामधील मैलाशुद्धीकरण केंद्रामध्ये स्थापत्यविषयक कामे करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास मंजुरी मिळणेबाबत... |
| विषय क्रमांक-४४) | पिंपरी चिंचवड शहरातील ३० मी. रुंदीचा उच्चतम द्रुतगती महामार्ग (HCMTR) विकसीत करणे व सांगवी जुना जकात नाक्याचे जागेवर सुशोभिकरण करणेकामी वास्तुविशारद व सल्लागार (Consultant & Architecture) नेमणेबाबत... |
| विषय क्रमांक-४५) | पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतीक आणि कला धोरणांतर्गत घेणेत येणा-या कार्यक्रमाच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत – मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४६) | तरतूद वर्ग करणेबाबत... |

--------

अ) दिनांक १९/०५/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक – ११५३३ विषय क्रमांक – १
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/२६२/२०१५ दि.३०/३/२०१५
विषय – प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या शाळा इमारतींची दैनंदिन साफसफाई करणे कामास

मुदतवाढीबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५३४ विषय क्रमांक – २

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग-मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)

सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३४७/१५ दि.२९/४/२०१५

विषय - अपंग कल्याणकारी योजना क्र.३ अपंगांना चलन वलन साधने खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५३५ विषय क्रमांक – ३

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१०९/१५ दि.५/५/२०१५

विषय - प्र.क्र.१७ मध्ये अंतर्गत पाथवे पेव्हींग ब्लॉक पध्दतीने करणेबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५३६ विषय क्रमांक – ४

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१०८/१५ दि.५/५/२०१५

विषय - प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील से.क्र.२७ मधील पेव्हींग ब्लॉकची दुरुस्तीची व अनुषंगिक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५३७ विषय क्रमांक – ५

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार(वैद्य)

सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३५६/१५ दि.६/५/२०१५

विषय – डिजीटल सोनोग्राफी मशिन खरेदीबाबत...

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५३८ विषय क्रमांक – ६
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – ब क्षेत्रिय कार्यालय,जलनिःसारण
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षे/जनि/TBdrainage/१४३/१५ दि.११/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.क्र.५/१८/२०१४-१५ अन्वये ब परिसरातील वार्षिकी ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबर्सची दुरूस्ती करणेकामी मे.विजय व्ही साळुंखे (नि.र.रू.४५,३४,७८२/- (अक्षरी र.रू.पंचेचाळीस लाख चौतीस हजार सातशे ब्याऐंशी फक्त) पेक्षा २८.१० % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेवून ठराव क्र.१०१५९ विषय क्र.६३ दि.३०/१२/२०१४ अन्वये यापुर्वी स्थायी समिती मार्फत मान्यता दिलेली आहे. सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ४७९ दि.२०/०५/२०१४ अन्वये र.रू.५०,००,०००/- स प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. तथापी सदर परिसरात सध्या व नव्याने उद्भवणारी जलनिःसारण नलिकेची व चेंबरची तातडीने दुरूस्ती करणे, आवश्यक असल्याने तसेच नव्याने देखभाल दुरूस्तीचे काम लवकर उपलब्ध होणार नसल्याने पुढील चार महिने कालावधीसाठी सध्याचे चालु कामा मधुनच काम करणे आवश्यक आहे यासाठी सदर काम निविदा रकमेपर्यंत (र.रू.४५,३४,७८२/-) करून घेणेचा प्रस्ताव आहे. त्याची सुधारित रक्कम रूपये ६३,०६,०००/- वाढीव र.रू.१३,०६,०००/- इतकी येत आहे. तरी ठेकेदाराकडुन मंजूर दराने सुधारीत काम करून घेणेस तसेच नियमानुसार निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५३९ विषय क्रमांक – ७
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/३८१/१५ दि.११/५/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा क क्षेत्रीय आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१५-१६ अन्वये, क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नाले खरडून साफ करणे व त्यातून निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतूक करून मोशी कचरा डेपोत खाली करून पसरून देणेकामी मे.जनसेवा स्वयंरोजगार सेवा सह. संस्था, श्री.राजु अशोक साठे (नि.र.रू.६,०४,६८३/- (अक्षरी र.रू.सहा लाख चार हजार सहाशे त्र्याऐंशी) पेक्षा ३४.९९ % कमी) या ठेकेदाराशी करारनामा करून कामाचा आदेश देण्यात येणार असल्याने क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नाले साफ करणे व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५४० विषय क्रमांक – ८
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी-३/कावि/४९०/१५ दि.१६/३/२०१५
विषय – मानसेवी पी.जी टिचर्सच्या नेमणुकीबाबत...

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५४१ विषय क्रमांक – ९

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – भूमि आणि जिंदगी

सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/१/कावि/१८२/१५ दि.१४/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील फेरीवाल्यांचे बायोमेट्रीक पध्दतीने सर्व्हेक्षण करणेबाबत ई-गर्व्हेनस विभागाकडील निविदा सुचना क्र.९/२०१४-१५ अन्वये निविदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदेमध्ये मे.जनसेवा स्वयं सेवा सह. संस्था यांनी (नि.र.रू.३८,६४,०००/- (अक्षरी र.रू.अडोतीस लाख चौसष्ट हजार) पेक्षा २.२६ % ने जास्त) (र.रु.३९,५१,४५१/-) या मंजुर दराने काम करुन घेणेस व नियमानुसार व निविदेतील अटी व शर्ती अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५४२ विषय क्रमांक – १०

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.फ क्षेत्रीय/आ/३/कावि/७०१/१५ दि.१४/०५/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२/२०१४-२०१५ अन्वये फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्ट्रॉम वॉटर चेंबर्स गटर्स सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ. वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरवून देणेकामी मे.संत गाडगेबाबा स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. (निविदा र.रू.४,५०,०१८/- (अक्षरी र.रु. चार लाख पन्नास हजार अठरा फक्त) प्र.क्र. १, २, ३, ४, ५, ९, ११, १२, १३ व २८ मधील स्ट्रॉम वॉटर चेंबर्स गटर्स सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ. वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरवून देणे याप्रमाणे ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्यांचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५४३ विषय क्रमांक – ११

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय

सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.फ क्षेत्रीय/आ/३/कावि/७००/१५ दि.१४/०५/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/१/२०१४-२०१५ अन्वये फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील नाले साफ सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ. वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरवुन देणेकामी मे.एम.जी.मंगळवेढेकर (निविदा र.रू. ३,७४,६४८/- (अक्षरी र.रु. तीन लाख चौ-याहत्तर हजार सहाशे अठ्ठेचाळीस फक्त) प्र.क्र.२, ४, ५, ९, १३

व २८ मधील नाले साफ सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ.वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरुवुन देणे याप्रमाणे ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्यांचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५४४ विषय क्रमांक – १२

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/४/कावि/१२७/१५ दि.१२/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्यादित, पुणे यांचेकडील पत्र क्र. प्रशासन/मु.कं./१४२ दि.२२/४/२०१५ अन्वये पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्यादित, चिखली शाखा यांचे वापरातील मौजे चिखली येथील महानगरपालिका शाळा इमारतीमधील गाळा क्र.३, ४, ५ व ६ (तळमजला) ११ महिने कालावधीसाठी भाडेकरार करणेकामी विनंती केलेली आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्यादित, पुणे, मुख्य कचेरी, ४ ब, बी.जे. रोड, पुणे-४११ ००१. यांना उपसंचालक, नगररचना व विकास विभाग यांनी ठरवुन दिलेल्या प्रतिमहा भाडे दर र.रु.२४/- प्रती चौ.फुट नुसार एकुण ९३६ चौरस फुटांचे ११ महिन्यांचे भाडे र.रु.२,४७,१०४/-, सेवाकर (१२.३६ %) र.रु.३०,५४२/- व चार महिन्यांचे भाडे रक्कम अनामत र.रु.८९,८५६/- असे एकूण र.रु.३,६७,५०२/- मनपा कोषागारात भरल्यानंतर करारनामा करुन पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्यादित, चिखली शाखेचे वापरासाठी मौजे चिखली येथील महानगरपालिका शाळा इमारतीमधील गाळा क्र.३,४,५ व ६ (तळमजला) माहे एप्रिल २०१५ पासून ११ महिन्याकरिता भाडयाने देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५४५ विषय क्रमांक – १३

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/५५१/१५ दि.१४/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा गणवेश देय पुरूष व महिला कर्मचा-यांकरीता गणवेश खरेदीकामी प्राप्त कापड नमुन्यांची तांत्रीक तपासणी मान्यता प्राप्त लॅब कडून करून घेणेकामी आलेल्या र.रू.२९,८२०/- (अक्षरी र.रू.एकोणतीस हजार आठशे वीस) चे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५४६ विषय क्रमांक – १४

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – सुरक्षा

सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/५४७/१५ दि.१५/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत पवनाथडी जत्रा २०१३-१४ हा उपक्रम राबवणेकामी सन २०१३-१४ या वर्षाकरिता नगारवस्ती विकास योजना विभागास

मा.स्थायी समिती ठराव क्र ४२२९ दिनांक ०१/१०/२०१३ अन्वये रक्कम रुपये ४०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चाळीस लाख रुपये फक्त) पर्यंतच्या खर्चास मान्यता देणेत आलेली होती. नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत सन २०१३-२०१४ करीता पवनाथडी जत्रेचे आयोजन केले असता नागरवस्ती विकास योजना विभागाकडील सन २०१३-२०१४ पवनाथडी जत्रासाठी केलेली तरतूद संपलेली असल्याने सन २०१३-२०१४ कालावधीतील बील अदा करणे आवश्यक आहे. त्याअन्वये पवनाथडी **जत्रा २०१४** कालावधीतल बील रक्कम रुपये ८४,२१४/- (अक्षरी रक्कम रुपये चौं-याऐंशी हजार दोनशे चौदा फक्त) नागरवस्ती विकास योजना विभागाकडील पवनाथडी जत्रासाठी केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५४७ विषय क्रमांक – १५
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – कामगार कल्याण
सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.काक/१/कावि/२४७/२०१५ दि.१५/५/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.औद्योगिक न्यायालय पुणे येथे ULP NO-3/2012, 4/2012, 5/2012, 7/2012 8/2012, 128/2011, 262/2010, 259/2010, 257/2010, 28/2012, 19/2011, 261/2010 या प्रकरणी मे.औद्योगिक न्यायालय यांनी निकाल दिला आहे. सदर प्रकरणी अँड.जयंत शाळीग्राम काम पहात असुन त्यांनी वकील फी र.रु.४४,०००/- मागणी केली आहे. अँड.जयंत शाळीग्राम यांना वकील फी र.रु.४४,०००/- वजा १०% आयकर र.रु.४,४००/- निव्वळ देय र.रु.३९,६००/- (अक्षरी र.रू.एकोणचाळीस हजार सहाशे) अदा करावयाची असल्याने होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५४८ विषय क्रमांक – १६
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – सुरक्षा
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/५४८/२०१५ दि.१६/५/२०१५
विषय – ई-निविदा सुचना क्र.१/२०१४-२०१५ (१०० ट्रॅफिक वार्डन पुरविणे) बाबत...

विषय क्रमांक १६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५४९ विषय क्रमांक – १७
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – सुरक्षा
सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/५४९/२०१५ दि.१६/५/२०१५
विषय – ई-निविदा सुचना क्र.२/२०१४-२०१५ (३७१ रखवालदार मदतनीस (अर्ध कुशल कामगार) पुरविणेबाबत...

विषय क्रमांक १७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५५० विषय क्रमांक – १८
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – सुरक्षा
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/५५०/२०१५ दि.१६/५/२०१५
विषय – ई-निविदा सुचना क्र.३/२०१४-२०१५ (२९४ रखवालदार मदतनीस पुरविणे) बाबत...

विषय क्रमांक १८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५५१ विषय क्रमांक – १९
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग –माहिती व जनसंपर्क
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/२/कावि/१३८/२०१५ दि.१५/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दि.१०/०४/२०१५ व दि.२३/०४/२०१५ रोजी विविध कार्यक्रमाच्या अनुशंगाने विविध मान्यवरांनी महापालिकेस भेट दिली. त्यावेळी सदर मान्यवरांची भोजन व्यवस्था हॉटेल सिट्रस, पिंपरी येथे करणेत आली होती. त्यासाठी र.रू.९,२४७/- (अक्षरी र.रु. नऊ हजार दोनशे सत्तेचाळीस फक्त) इतका खर्च भोजन व्यवस्थेवर झालेला आहे. सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५५२ विषय क्रमांक – २०
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/४७१/२०१५ दि.१५/५/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे मध्यवर्ती औषध भांडार विभागाकडील झेरॉक्स मशीन दुरुस्त करणे कामी आवश्यक असलेले स्पेअरपार्ट साहित्य (एकूण ५ बाबी) खरेदी करुन दुरुस्ती करणेकामी कोटेशन नोटीस क्र.५४/२०१४-१५ अन्वये मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन सिल बंद लिफाप्यात कोटेशन दर मागविण्यात आले होते. त्यानुसार सिलबंद लिफाप्यात तीन दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.फोनिक्स बिजनेस मशीन, यांचे आवश्यक झेरॉक्स मशीन दुरुस्तीचे बाब क्र.१ ते ०५ साहित्याचे र.रु.२५,९४६/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २.६६ % ने कमी आहे. मे.फोनिक्स बिजनेस मशीन, पुणे. यांचे आवश्यक झेरॉक्स मशीन दुरुस्ती करणेकामी एकूण र.रु.२५,९४६/- दर स्विकृत करण्यास मा.सह आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५५३ विषय क्रमांक – २१

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/१२४/१५ दि.१९/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५०/४/२०१४-१५ अन्वये प्रभाग क्र.४६ येथे स.नं.८८ ज्योतीबा उद्यानासाठी नदीचे कडेने फेरो क्रेट फेन्सींग करणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२८,००,८०५/- (अक्षरी र.रु.अठ्ठावीस लाख आठशे पाच फक्त) पेक्षा २७.२७% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२१,३८,८७७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५५४ विषय क्रमांक – २२

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – उद्यान

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४अ/कावि/३७४/१५ दि.१५/०५/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.८/२०१४-१५ मधील बाब क्र.१ अन्वये, क, ड, ई क्षेत्रीय कार्यालयांतर्गत उद्यान विभागासाठी लोखंडी बेंचेस पुरविणे व बसविणे कामी मे.अथर्व स्वयंरोजगार औद्योगिक सेवा एस.एस.मर्यादित निविदा र.रु.९,६१,४००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख एकसष्ट हजार चारशे फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११ टक्के कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून त्यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५५५ विषय क्रमांक – २३

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी१/कावि/४२४/१५ दि.१९/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयाकरिता आवश्यक असलेली प्रस्तावात प्रपत्र अ मध्ये नमूद केलेली पदे ही एकत्रित मानधनावर ६ महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात भरावी लागणार आहेत आणि सदर पदांना प्रस्तावात प्रपत्र ब मध्ये नमूद केलेल्या अनुभवाप्रमाणे दरमहा एकत्रित मानधन रक्कम अदा करणेस यापूर्वी मान्यता मिळालेली आहे. यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामधील एकत्रित मानधनावर भरण्यात येणारी हाऊसमन रजिस्टार, डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदांची परीक्षा यापुढे प्रशासन विभागाने घ्यावी असे मा.आयुक्त सो.यांनी दि.०७/०८/२०१४ रोजी शेरांकन केलेले आहे. त्याप्रमाणे १) त्यानुसार प्रशासन विभागाकडून सदर पदांची परीक्षा घेऊन निवड यादी तयार करुन मिळणेस मान्यता मिळावी, तसेच २) वायसीएम रुग्णालयात आवश्यक असणा-या प्रस्तावात नमूद पदांची जाहीरात देऊन

भरणेस मान्यता मिळावी. ३) जाहीरातीद्वारे पुर्ण क्षमतेने सदर पदांना उमेदवार न मिळाल्यास त्यासाठी पुढील ६ महिन्यात दर सोमवारी Walk in interview ने पदे भरण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५५६ विषय क्रमांक – २४

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी१/कावि/४२५/१५ दि.१९/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयाकरीता आवश्यक असलेली प्रस्तावात प्रपत्र अ मध्ये नमूद केलेली कान, नाक, घसा सर्जन ही दोन्ही पदे मानधनावर ६ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर भरणेस, तसेच सदर पदे वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवून भरणेस आणि सदर पदांना प्रस्तावात प्रपत्र ब मध्ये नमूद केलेल्या अनुभवाप्रमाणे दरमहा एकत्रित मानधन रक्कम अदा करणेस आणि प्रस्तावात नमूद प्रपत्र अ मधील पदाकरीता उमेदवार न मिळाल्यास सदर पदे भरेपर्यंत दर सोमवारी Walk in interview ने पदे भरण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५५७ विषय क्रमांक – २५

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं/४/कावि/५१५/२०१५ दि.१३/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

खालील नमुद केलेल्या अ.क्र.१ व २ कर्मचा-यांना त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या एकत्रित मानधन रकमेवर दि.०९/०६/२०१५ रोजी एक दिवस सेवाखंड देऊन दि.१०/०६/२०१५ ते ०९/१२/२०१५ पर्यंत ०६ महिने कालावधीकरीता हंगामी नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम | मानधन र.रु. |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती.गलांडे पुनम भानुदास | मानधन निदेशक | १७,०००/- |
| २ | श्री.घसिंग जनार्दन विठ्ठलराव | मानधन निदेशक | १७,०००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५५८ विषय क्रमांक – २६

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी

सुचक –मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं/४/कावि/५३५/२०१५ दि.१२/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

खालील नमुद केलेल्या अ.क्र.१ ते ९ कर्मचा-यांना मा.उच्च न्यायालय यांच्या आदेशास अधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दि.२१/०५/२०१५ रोजी एक दिवस सेवाखंड देऊन दि.२२/०५/२०१५ ते २१/११/२०१५ पर्यंत ०६ महिने कालावधीकरीता र.रु.१७,०००/- एकत्रित मानधनावर हंगामी नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

प्रपत्र “अ”

| अ.क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीम. सातकर उज्वला लक्ष्मण | मानधन निदेशक |
| २ | श्री. काळोखे विक्रमसिंह वसंत | मानधन निदेशक |
| ३ | श्री. लांडगे निलेश खुशालचंद | मानधन निदेशक |
| ४ | श्री. दुधाळ भानुदास धर्माजी | मानधन निदेशक |
| ५ | श्रीमती. बोरसे वृंदावनी बन्सीलाल | मानधन निदेशक |
| ६ | श्री. ताठे शहाजी पांडूरंग | मानधन निदेशक |
| ७ | श्री. शिंदे प्रकाश शिवाजी | मानधन निदेशक |
| ८ | श्रीमती. जाधव सीमा यशवंत | मानधन निदेशक |
| ९ | श्री. गावडे किसन दत्तात्रय | मानधन निदेशक |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५५९ विषय क्रमांक – २७

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/४८२/२०१५ दि.२०/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमधील कॉरीडॉर, अंतर्गत व बाहय परिसराची यांत्रिक पध्दतीने तसेच मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणे या कामासाठी आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत ई-निविदा नोटीस क्र.९/२०१४ – १५ प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ४ निविदाधाराकांपैकी पात्र ३ निविदाधारक १) मे.सुमित फॅसिलिटीज प्रा.लि., २) मे.ब्रिक्स इंडिया प्रा.लि., ३) मे.बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि. यांनी सादर केलेल्या दरपत्रकामध्ये मे.बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि. यांनी सदर कामासाठी सादर केलेला र.रु.४०,८०,०००/- हा दर निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा (र.रु.४४,३५,०००/-) ८% इतका सर्वात कमी सादर केला आहे. सदरचे लघुत्तम दराने मे.बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि. यांची मनपा मुख्य इमारतीमधील कॉरीडॉर, अंतर्गत व बाहय परिसराची यांत्रिक पध्दतीने तसेच मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणेकामी १ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणे, याकामी त्यांचेशी आवश्यक अटी/शर्तीचा करारनामा करणे, कामाचे आदेश देणे व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांचे साफसफाईचे कामकाज समाधानकारक असल्यास एक वर्षानंतर पुढील दोन वर्षे कालावधीकरीता किमान वेतन कायद्याप्रमाणे वेळोवेळी होणा-या दरांनुसार मनुष्यबळाचे दर ग्राह्य धरुन व इतर कोणतीही वाढ न देता म्हणजेच आवश्यक लागणारी उपकरणे, रसायने व तत्सम बाबींसाठी लागणा-या खर्चामध्ये वाढ न करता साफसफाईचे कामकाज त्यांचे समवेत करण्यात येणा-या करारनाम्यास अधिन राहून होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५६०
विषय क्रमांक – २८
दिनांक – २६/०५/२०१५
विभाग – झो.नि.पु. स्थापत्य
सुचक –मा.प्रसाद शेट्टी
अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/कावि/१७४/२०१५ दि.५/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन A-7, मिलिंदनगर पुनर्वसन प्रकल्पातील A-2 इमारतीकरीता MPCB कडून Consent to Operate मिळणेसाठी र.रु.३०,०००/- व अधिक फॉर्म फी र.रु.२००/- असे एकूण र.रु.३०,२००/- (अक्षरी र.रु.तीस हजार दोनशे फक्त) त्यांचेकडे जमा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५६१
विषय क्रमांक – २९
दिनांक – २६/०५/२०१५
विभाग – दूरसंचार
सुचक –मा.हिरानंद आसवाणी
अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/४/कावि/७४/२०१५ दि.२१/५/१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

३ जी वायरलेस डोंगल सुविधा वरीष्ठ अधिकारी, विभागप्रमुख, अभियंते व विविध कार्यालये यांना पुरविणेस तसेच यापुढे मागणीप्रमाणे सदरची डोंगल सुविधा पुरविणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५६२
विषय क्रमांक – ३०
दिनांक – २६/०५/२०१५
विभाग – क्रीडा
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे
अनुमोदक – मा.संपत पवार

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७/कावि/२६१/२०१५ दि.५/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा समिती सभा ठराव क्र.१०१ दि.२१/०५/२०१५ नुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता १४३ विद्यार्थी खेळाडूंना खालीलप्रमाणे एकूण र.रु.५,१७,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख सतरा हजार फक्त) इतकी शिष्यवृत्ती रक्कम अदा करावी लागणार आहे.

| पात्र / अपात्र | राज्यस्तर | आंतरविद्यापीठ | राष्ट्रीयस्तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| पात्र | ९० | ९ | ४४ | १४३ |
| अपात्र | ४४ | - | ९ | ५३ |
| एकूण | १३४ | ९ | ५३ | १९६ |

| **अ.क्र.** | **स्पर्धेचा स्तर** | **प्रत्येकी शिष्यवृत्ती र.रु.** | **एकूण खेळाडू** | **एकूण शिष्यवृत्ती र.रु.** |
|---|---|---|---|---|
| **१** | **राज्यस्तर** | **३,०००/-** | **९०** | **२,७०,०००/-** |
| **२** | **आंतरविद्यापीठ** | **३,०००/-** | **९** | **२७,०००/-** |
| **३** | **राष्ट्रीयस्तर** | **५,०००/-** | **४४** | **२,२०,०००/-** |
| | | **एकूण -** | **१४३** | **५,१७,०००/-** |

सबब म.न.पा.परिसरातील शालेय १४३ पात्र विद्यार्थी खेळाडूंना सन २०१३-१४ ची क्रीडा शिष्यवृत्ती र.रु.५,१७,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख सतरा हजार फक्त) अदा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५६३ विषय क्रमांक – ३१
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/३/कावि/२२/२०१५ दि.१५/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रीडा समिती सभा ठराव क्र.१०२ दि.२१/०५/२०१५ नुसार सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात नोंदणीकृत सार्व.संस्था / मंडळे यांचेकडून प्राप्त झालेल्या अर्जापैकी पात्र झालेल्या संस्थांना १) साई संस्कार संस्था, आकुर्डी, पुणे र.रु.२,९०,०००/- २) चैतन्य महिला मंडळ, भोसरी र.रु.२,९०,०००/- ३) शारदा महिला बालविकास शिक्षण प्रसारक मंडळ, पिंपळे गुरव, पुणे र.रु.१,४७,२२२/- ४) साई मित्रमंडळ, शाहूनगर,चिंचवड र.रु.२,९०,०००/- ५) ममता शिक्षण ट्रस्ट, म्हेत्रेवस्ती, चिखली र.रु.९८,४४३/- व ६) माई बालभवन, मामुर्डी, पुणे र.रु.१,३२,४२६/- या प्रमाणे एकूण र.रु.१२,४८,०९१/- (अक्षरी र.रु.बारा लाख अठ्ठेचाळीस हजार एक्याण्णव फक्त) अनुदान अदा केले असल्याने त्याचे अवलोकन होऊन त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५६४ विषय क्रमांक – ३२
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक –मा.बाळासाहेब तरस अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/८/कावि/३८/२०१५ दि.१९/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा समिती सभा ठराव क्र.१०३ दि.२१/०५/२०१५ नुसार महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्र.१८ प्रमाणे आंतराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे कु.वैष्णवी आनंदराव आंद्रे हिची बँकॉक थायलँड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस् चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.४१,२५०/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनश पन्नास फक्त) कु.वैष्णवी आनंदराव आंद्रे हिस आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५६५ विषय क्रमांक – ३३
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/३९६/२०१५ दि.१८/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा समिती सभा ठराव क्र.१०४ दि.२१/०५/२०१५ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व महाराष्ट्र राज्य रोलबॉल असोशिएशन यांच्या मान्यतेने, पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोशिएशन तसेच प्रबोधनकार विकास क्रीडा संस्था, यमुनानगर यांच्या संयुक्त विद्यमाने माहे मे/जून २०१५ मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटींग रिंग यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.६,७५,७२८/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता तसेच स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च र.रु.६,७५,७२८/- मधील मैदान तयार करणे, स्टेज, मंडप, टेबल, खर्च्या व्यवस्था खर्च, खेळाडू निवास व्यवस्था, गाद्या, उशा, बेडशिटस्, चादर, बादली, मग इ. भाडे खर्च एकूण र.रु.१,४८,०००/- हा स्थापत्य विषयक खर्च स्थापत्य विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.४०,०००/- हा विद्युत विषयक खर्च, विद्युत विभाग संबंधित क्षेत्रीय कर्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.४,८७,७२८/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५६६ विषय क्रमांक – ३४
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक –मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/३९९/२०१५ दि.१८/५/२०१५
विषय - मा.नगरसदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मा.नगरसदस्य, पुणे महानगरपालिका यांचा क्रिकेट सामना आयोजित करणेस व सदर सामना अनुषंगाने येणारे खर्चास मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक ३४ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५६७ विषय क्रमांक – ३५
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.संपत पवार
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/३७३/२०१५ दि.२१/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

झोनिपु स्थापत्य विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/१७-२०१४-२०१५ मधील क्र.१३ अन्वये प्रभाग क्र.२८, ४२, ४३ व ५६ मधील झोपडपट्टयांमध्ये मनपा इमारत सांस्कृतिक इमारतीची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.एम.बी.कन्स्ट्रक्शन नि.र.रु. १३,९५,४३७/- (अक्षरी र.रु.तेरा लाख पंच्याण्णव

हजार चारशे सदतीस फक्त) पेक्षा ४३.१०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.७,९४,००४/- पर्यंत काम करुन बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक –११५६८ विषय क्रमांक – ३६
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय
सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.११५३० दिनांक १९/५/२०१५ रद्द करण्यात यावा व फ क्षेत्रीय कार्यालयातील मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ८७,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५६९ विषय क्रमांक – ३७
दिनांक – २६/०५/२०१५
सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.११५२४ दिनांक १९/५/२०१५ मधीन "एकत्रित मानधनावर" या मजकूरानंतर "दिनांक २९/५/१५ पासून पुढील अकरा महिने" हा मजकूर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५७० विषय क्रमांक – ३८
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – ड क्षेत्रीय स्थापत्य
सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

"ड" प्रभाग व "ड" मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१२,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५७१ विषय क्रमांक – ३९
दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – ड क्षेत्रीय स्थापत्य
सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

"ड" प्रभाग व "ड" मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५,७५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –११५७२ विषय क्रमांक – ४०

दिनांक – २६/०५/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

ब क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२,९५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५७३ विषय क्रमांक – ४१

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – फ क्षेत्रीय स्थापत्य

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रीय कार्यालय मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३२,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५७४ विषय क्रमांक – ४२

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक– मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/कक्षे/वायसीएमएच/३६१/२०१५ दि.२५/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या वायसीएमएच येथील १०१० KVA क्षमतेच्या जनित्रसंचाचे वार्षिक देखभाल दुरुस्ती कामांतर्गत जनित्र संचाच्या दोन बॅटरी (पल्स लाईट, १२ व्होल्ट, १६० AH) बदलणे आवश्यक आहे. त्यानुसार मे.ट्रायडेंट सर्व्हीसेस, पुणे यांनी ५% सूट देऊन र.रु.५७,३७१/- चे कस्टमर कोटेशन क्र.QUO-TS-SW-1516-000444 दिनांक १३/४/२०१५ अन्वये सादर केले आहे. त्यानुसार त्यांना कमिन्स मेक, पल्स लाईट, १२ V/160 AH, २ बॅटरीजचा पुरवठा केल्यानंतर एकुण र.रु.५७,३७१/- (अक्षरी रक्कम रु. सत्तावन्न हजार तीनशे एक्काहत्तर फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५७५ विषय क्रमांक – ४३

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक– मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/२/कावि/२४८/२०१५ दि.२१/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पवना नदीच्या पात्रामध्ये ठिकठिकाणी तयार झालेले प्रवाहातील कृत्रिम/नैसर्गिक अडथळे काढून नदीचा प्रवाह वाहता करणेसाठी आवश्यक कामे करणेच्या वाढीव कामासह येणा-या एकुण ३७.५५ लाख (वाढीव १२.५५ लाख) च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५७६ विषय क्रमांक – ४४

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – बी.आर.टी.एस.

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक– मा.संपत पवार

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बीआरटीएस/सह.शह/४५०/२०१५ दि.२५/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहरातील ३० मी. रुंदीचा उच्चतम द्रुतगती महामार्ग (HCMTR) विकसीत करणे, एच.सी.एम.टी.आर. च्या रुंदीमध्ये जॉगिंग ट्रॅक विकसीत करणे, उद्यान (Landscape) विकसीत करणे व सांगवी जुना जकात नाक्याचे जागेवर सुशोभिकरण इ. कामे करणेबाबत मा.आमदार चिंचवड विधानसभा मतदारसंघ यांनी दि. ०५/०२/२०१५ च्या पत्रान्वये मागणी केली आहे.

या कामासाठी महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षांतर्गत पान क्र.३१, अ.क्र.५५ वर र.रु.१,००,००,०००/- च्या कामासाठी र.रु.१०,००,०००/- तरतुद करण्यात आली आहे व महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पास मा.महापालिका सभा ठराव क्र. ६६३, दि. ०६/०४/२०१५ अन्वये प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. उच्चतम द्रुतगती महामार्ग (HCMTR) विकसीत करणेसाठी संकल्प चित्र व आराखडा (Architectural Drawing & Design) तयार करणे, पुर्वगणनपत्रक (Estimate) तयार करणे या निविदापूर्व (Pretender Activity) बाबी व निविदापश्चात बाबी (Post Tender Activity) करण्यासाठी वास्तुविशारद व सल्लागार (Architecture & Consultant) नेमणे आवश्यक आहे. या कामासाठी इनग्रेन (Ingrain) यांची नेमणुक करणेसाठी वास्तुविशारद इनग्रेन (Ingrain) चे श्री.किरण काळे यांचा समावेश महानगरपालिकेच्या पॅनेलवर करणे प्रथम आवश्यक आहे. त्यांचा समावेश महानगरपालिकेच्या पॅनेलवर करणे व पिंपरी चिंचवड शहरातील ३० मी. रुंदीचा उच्चतम द्रुतगती महामार्ग (HCMTR) विकसीत करणे व सांगवी जुना जकात नाक्याचे जागेवर सुशोभिकरण करणेसाठी वास्तुविशारद इनग्रेन (Ingrain) यांची वास्तुविशारद व सल्लागारपदी (Architecture & Consultant) नेमणूक करणे तसेच महानगरपालिकेच्या प्रचलित दरानुसार फि अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

निविदापूर्व (Pretender Activity) बाबी व निविदापश्चात बाबी (Post Tender Activity) कामे करणेसाठी प्रकल्प सल्लागार यांस मनपाच्या प्रचलित दरानुसार प्रकल्पाच्या स्विकृत निविदा किंमतीच्या (Accepted Tender Amount) १.४५% + ०.९०% अशी एकूण २.३५% फि अदा करावी लागणार आहे. यामध्ये सर्वेक्षण करणे, आराखडे तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे त्यांस तांत्रिक मान्यता घेऊन निविदा मागविणेकामी निविदा संच (Tender Set) तयार करणे निविदापूर्व बैठक (Prebid Meeting), सामान्य विचलन संच (C.S.D.) तयार करणे व ठेकेदारास कामाचे आदेश दिल्यानंतर मंजूर गुणवत्ता नियंत्रण आराखड्याप्रमाणे (Approval Q.A.P.) गुणवत्तेने काम करुन घेणे इ. प्रमुख बाबींचा समावेश आहे. वास्तूविशारद इनग्रेन (Ingrain) यांची सदर कामासाठी सल्लागार पदी नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५७७ विषय क्रमांक – ४५

दिनांक – २६/०५/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतीक आणि कला धोरण तयार करणेत आले असून त्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.४२३ दिनांक १८/०१/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्या अनुषंगाने यापुढे दर वर्षी सांस्कृतीक आणि कला धोरणांतर्गत कार्यक्रम आयोजित करणेकामी आवश्यकतेप्रमाणे निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पद्धतीने अंदाजपत्रकीय तरतुदीचे मर्यादेत येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता व दिनांक ३१ मे २०१५ रोजी धनगरी ढोल, गजनृत्य हे कार्यक्रम आयोजनासाठी येणाऱ्या र.रु.१,१०,००२/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५७८ विषय क्रमांक – ४६

दिनांक – २६/०५/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. मभां/७/कावि/५८३/१५ दि.२५/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सन २०१५-१६ करिता विद्युत साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर उपलब्ध तरतुद र.रु.४,००,००,०००/- मधुन र.रु.८०,००,०००/- “गणवेश खरेदी” या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५८/२०१५
दिनांक - २७/०५/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.